# ई-निविदा सुचना

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत परभणी जिल्हयातील सन २०१६-१७ या आर्थिक वर्षाचे AMRS लेखापरिक्षण (Account Related management Services) सनदी लेखापाल मार्फत करण्यासाठी सनदी लेखापरिक्षकाची नेमणुक करावयाची असुन, त्यासाठी ई-निविदा मागविण्यात येत आहे. त्याबाबत किमान निकष, गुणाकनांची पध्दत, अटी व शर्ती अर्जासोबत आवश्यक असणारी कागदपत्रे वित्त देकार या बाबतची सविस्तर माहिती महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईट http://Mahatenders.gov.in या वेबसाईटवर (संकेतस्थळावर) Online पध्दतीने दि.२७/०६/२०१७ (मंगळवार) सकाळी ११.०० वाजेपासून दि.०७/०७/२०१७ (शुक्रवार) दुपारी ४.०० वाजे पर्यंत सुटीचे दिवस वगळता उपलब्ध्द असेल या कालावधीत इच्छुक सनदी लेखापालांनी ऑनलाईन अर्ज सादर करावेत. ऑनलाईन अर्ज सादर करावयाची मुदत वरील प्रमाणे असून ई-निविदा हया दि.१०/०७/२०१७ रोजी सकाळी ११.०० वाजता किंवा सक्षम अधिकारी ठरवतील त्यावेळेसगठीत केलेली समिती व संबंधीत निविदा धारकासमोर उघडण्यात येतील.

यासाठी निविदा फॉर्मची किमत ५००/- (अक्षरी पाचशे फक्त) ना परतावा आहे. तसेच निविदे सोबत बयाना रक्कम रु.१०,०००/-(अक्षरी दहा हजार फक्त) ऑनलाईन भरण्यात यावेत. त्याशिवाय निविदा ग्राहय धरण्यात येणार नाहीत.

निविदा शुल्क न भरलेल्या, तसेच सविस्तर माहिती भरणा न केलेल्या निविदेचा विचार केला जाणार नाही. निविदाकाराने यांच्या निविदा ऑनलाईन/इलेक्ट्रॉनिक पध्दतीने सादर कराव्यात. निविदा संबंधीच्या पुढील सुचना/शुध्दीपत्रके इंटरनेटच्या उपयोगाने ऑनलाईन करण्यात येतील.निविदेच्या अटी व शर्ती किमान निकष, सुचना व इतर आवश्यक माहिती सोबत जोडली असून सदरील निविदा किंवा निविदेचा कोणताही भाग, यामध्ये कोणतीही पुर्व सुचना न देता रद्द करण्याचा/ नाकारण्याचा / स्विकारण्याचा / राखुन ठेवण्याचा हक्क जिल्हाधिकारी तथा जिल्हा कार्यक्रम समन्वयक, (मग्रारोहयो) परभणी यांनी राखुन ठेवला आहे. निविदासंचाची विक्री स्विकृती ही सदर वेबसाईटवरुन फक्त ऑनलाईन पध्दतीने करण्यात येत असून सर्व निविदा दोन पाकीट पध्दतीने मागविण्यात येत आहे.

सदरील निविदे संदर्भात कोणताही न्यायालयीन खटला उदभवल्यास तो परभणी जिल्हा न्यायालयाच्या कार्यक्षेत्रात चालविल्या जाईल. कोणत्याही स्पष्टीकरण करीता निविदाकाराने ई-निविदा संबंधीत अधिक माहितीसाठी रोजगार हमी योजना विभाग जिल्हाधिकारी कार्यालय परभणी यांचे E-mail ID: egsdycoll.par-mh@gov.in व दुरध्वनी क्र. 02452-233 383 वर संपर्क साधावा.

ठिकाण : परभणी.
दिनांक :१९/०६/२०१७

सही/-
जिल्हाधिकारी तथा
जिल्हा कार्यक्रम समन्वयक
मग्रारोहयो. परभणी